ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

' अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख १५ जुलै, १९५९ | अंक २८

## विविध माहिती

**क्यूबा-भारत व्यापाराची शक्यता**—क्यूबामधील एक राष्ट्रीय पुढारी नुकतेंच भारतांत आले असतांना त्यांनीं भारत व क्यूबा ह्यांच्या दरम्यान होऊं शकणाऱ्या व्यापारासंबंधी मध्यवर्ती सरकारच्या व्यापार खात्याच्या अधिकाऱ्यांशीं बोलणीं केलीं. क्यूबाला भारताकडून शिकाऊ विमानें, रेल्वेची सामुग्री, फिल्म्स, कापड, चहा, इत्यादि माल पाहिजे आहे. उलटपक्षीं, क्यूबा भारताला तांबें, कोको, टायर्स तयार करण्यासाठी लागणारी रेयॉनची सुतळी, इत्यादि पुरवूं शकेल.

**आरोग्य विमा योजना**—दिल्ली येथील मेडिकल असोसिएशननें कुटुंबांच्या हितासाठी आरोग्य विमा योजना चालू करण्याचें ठरविलें आहे. योजनेंत काम करण्यास १०० डॉक्टर्स तयार झाले आहेत. योजनेंत सामील होणाऱ्या कुटुंबाला वार्षिक १०० रुपये फी द्यावी लागेल. कुटुंब म्हणजे विमेदार, त्याची पत्नी व मुलें, अशी व्याख्या करण्यांत आली आहे.

**मुंबई राज्यांतील विकासाचीं कामें**—मुंबई सरकारनें चालू आर्थिक वर्षांत राज्यांतील विकासाच्या कामावर ९० कोटी रुपये खर्च करण्याचें ठरविलें आहे, अशी माहिती स्थानिक स्वराज्य मंत्री श्री. माणेकलाल शहा ह्यांनीं सांगितली. राज्यांत निरनिराळ्या ठिकाणीं चालू असलेल्या कामाची गति वाढण्यास ह्या खर्चाची मदत होणार आहे.

**कराची येथील विमानतळाची सुधारणा**—कराची येथील विमानतळ आंतरराष्ट्रीय विमानवहातुकीच्या दृष्टीनें महत्त्वाचा आहे. ह्या तळाची सुधारणा करण्यासाठी अमेरिकेनें पाकिस्तानला ४८ लाख डॉलर्स कर्ज देण्याची तयारी दाखविली आहे. तळावर जेटवर चालणारीं मोठीं विमानें १९६१ सालीं उतरूं शकण्याच्या दृष्टीनें विमानतळाची सुधारणा करण्यांत येणार आहे.

**गंगेच्या खोऱ्यांत तेलाचा शोध**—भारताच्या तेल आणि नैसर्गिक वायु कमिशननें गंगेच्या खोऱ्याच्या वरील भागांत खनिज तेलाचा शोध करण्याचें ठरविलें आहे. ह्या कामीं पश्चिम जर्मनीच्या सरकारनें तांत्रिक व आर्थिक साह्य देण्याचें कबूल केलें आहे. त्याशिवाय कच्छ विभागांत तेलाचा शोध करण्यासाठीं एका फ्रेंच कंपनीचें सहकार्य मिळविण्याचेहि प्रयत्न करण्यांत येत आहेत.

**रशिआ-अमेरिका व्यापार**—रशिआ व अमेरिका ह्या दोन देशांतील व्यापार वाढावा म्हणून रशिआतर्फे प्रयत्न करण्यांत येत आहेत. परंतु अमेरिकेनें लष्करी दृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या मालाच्या निर्यातीवरील निर्बंध सैल करावे अशी त्याची अपेक्षा आहे. रोज खपाच्या वस्तू मोठ्या प्रमाणावर घेण्याची रशिआची तयारी नाहीं. त्यामुळें व्यापारांत वृद्धि होण्याचा फारसा संभव नाहीं.

**कच्च्या फिल्मचा कारखाना**—उटकमंड येथें काढण्यांत यावयाच्या कच्च्या फिल्मच्या कारखान्याची कमाल उत्पादनक्षमता ठरल्यापेक्षा दुप्पट करण्याचें घाटत आहे. ह्या कारखान्याच्या उभारणीसाठी ९ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज होता. आतां उत्पादनक्षमता वाढविण्याचें ठरल्यास उभारणीसाठी २० ते २१ कोटी रुपये लागण्याची शक्यता आहे.

**ओरिसांतील एंजिनिअरिंग कॉलेज**—उत्कल विद्यापीठानें १९५६ सालीं स्थापन केलेल्या एंजिनिअरिंग कॉलेजचें औपचारिक उद्घाटन नुकतेंच झालें. ओरिसांतील हें एकमेव एंजिनिअरिंग कॉलेज आहे. सध्यां कॉलेजमध्यें १०० विद्यार्थ्यांची शिकण्याची सोय आहे. ओरिसा औद्योगिक दृष्ट्या मागासलेला असल्यानें कॉलेजला विशेष महत्त्व आहे.

**रशिआच्या मनुष्यबळाचा नाश**—दुसऱ्या महायुद्धांत रशिआचे सुमारें ७० लाख पुरुष मारले गेले असा अंदाज पूर्वी करण्यांत आला होता. परंतु आतां केलेल्या दुरुस्त अंदाजाप्रमाणें सुमारें १॥ ते २ कोटी पुरुष मारले गेले असावेत. युद्धोत्तर काळांत, कारखान्यांतील कामाला लागणारीं धडधाकड माणसें मिळण्यास रशिआला अडचण भासत असे.

**शिक्षकांसाठी गटविमायोजना**—प्राथमिक व माध्यमिक शाळांत काम करणाऱ्या शिक्षकांना गटविमायोजनेचा फायदा देतां येईल कीं नाहीं ह्याविषयीं राज्यसरकारांचे शिक्षणमंत्री विचार करीत आहेत. राज्यसरकारांच्या शिक्षणखात्याच्या चिटणिसांची एक संयुक्त बैठक दिल्ली येथें नुकतीच झाली. त्यांत इतर प्रश्नांबरोबर ह्याहि प्रश्नाचा विचार झाला.

**नवीन बोटींची खरेदी**—शिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीनें मालाची वहातूक करणारें १२,००० टनांचें एक जहाज विकत घेतलें आहे. जहाज जुनें आहे. जहाजाच्या खरेदीसाठी भारत सरकारच्या वहातूक खात्यानें १३ लाख रुपयांचें परदेशीय चलन मंजूर केले आहे. जहाज जी वहातूक करील त्याच्या उत्पन्नामधूनच त्याची किंमत फेडण्यांत येणार आहे.

**इराकच्या कापसाची खरेदी**—इराकनें रशिआला ६,००० टन कापूस विकत देण्याचा करार केला आहे. त्यापैकी १,७०० टन कापूस रवानाहि झाला आहे. कापसाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेंत जो भाव असेल त्यापेक्षा थोडा अधिक भाव रशिआनें दिला आहे इराक व रशिआ ह्यांच्यामधील बहुतेक व्यापारी करार सरकारी पातळीवर करण्यांत येतात.

**उसाची किंमत वाढवून द्या**—श्रीरामपूर तालुका शेतकरी-संघानें शेतकऱ्यांकडून साखरकारखान्यांना पुरविण्यांत येणाऱ्या उसाची किंमत दर टनाला ४७-७५ रुपयांऐवजी ५५ रुपयांपर्यंत वाढवून देण्याची मागणी मध्यवर्ती सरकारकडे केली आहे. श्रीरामपूर व कोपरगांव तालुक्यांत मिळून खाजगी मालकीचे ५ साखर कारखाने आहेत. त्यांना ३,००० शेतकऱ्यांकडून सुमारें २ लाख टन ऊस पुरविण्यांत येतो.

**कच्च्या फिल्मचा कारखाना**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत कच्ची फिल्म तयार करण्याचा एक कारखाना म्हैसूर राज्यांत काढण्यांत यावा असा आग्रह राज्य-सरकार करीत आहे. अशा प्रकारचा पहिला कारखाना उटकमंड येथें काढण्याचें घाटत आहे. प्रथम हा कारखाना म्हैसूर राज्यांत निघणार होता पण नंतर तो मद्रास राज्यांत काढण्यांत यावा असें ठरलें.

**पंजाब सरकारच्या नौकरांची सोय**—पंजाब सरकारनें आपल्या नौकरांची राहण्याची सोय करण्यासाठी ८ कोटी रु. खर्चाची योजना तयार केली आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत तिची अंमलबजावणी करण्यांत येणार आहे. त्याशिवाय कामगारांसाठी व कमी उत्पन्नवाल्या लोकांसाठीहि गाळे बांधण्याचा सरकारचा विचार चालू आहे.

**उत्तर प्रदेशांत अल्युमिनमचा कारखाना** – उत्तर प्रदेशांत रिहंड येथें अल्युमिनमचा कारखाना काढण्याबाबत अमेरिकेंतील कैसर कंपनी व बिर्ला शेठ ह्यांच्यांत करार झाल्याची वार्ता आहे. कारखान्यासाठीं लागणारें परदेशीय चलन कैसर कंपनी व आयात-निर्यात बँक पुरविणार आहे. रिहंड धरणापासून विजेचा पुरवठा घेऊन दरसाल २०,००० टन अल्युमिनम तयार करण्यांत येईल.

**गुजरात विद्यापीठाला मदत**—मुंबई सरकार आणि विद्यापीठ अनुदानमंडळ गुजरात विद्यापीठाला चालू शैक्षणिक वर्षांत ७ लाख, ४० हजार रुपयांची मदत करणार आहे. विद्यापीठाची कचेरीची इमारत बांधून झाली आहे. मुंबई सरकार विद्यापीठाच्या शास्त्रशाखेसाठीं २ लाख, ४० हजार रुपये देणार आहे.

**हरिजनांच्या वसतिगृहांची व्यवस्था**— आंध्र राज्यांत हरिजन विद्यार्थ्यांसाठी ४० वसतिगृहें चालविण्यांत येतात. ह्या वसतिगृहांची व्यवस्था सरकारी चालक पहातात. पण त्यांच्या कडून हें काम नीट पार पाडण्यांत येत नाहीं अशा तक्रारी करण्यांत येत होत्या. आंध्र सरकारनें आतां पहिल्या चालकांना काढून त्यांच्या जागीं विश्वासू सार्वजनिक कार्यकर्त्यांची नेमणूक करण्याचें ठरविलें आहे.


*** दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड ***

( शिड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस :–१० बुधवार पेठ, पुणें २
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन ६५६३ )

अध्यक्ष
श्री. ग. रा. साठे

मुंबई शाखा :–८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १
कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन २५३४०८ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | ... ... | रु. ७,३०,४९० |
| खेळतें भांडवल | ... ... | रु. ५६,००,००० |

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज १½% टक्के ★ मुदत ठेवींवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एल्एल्. बी. मॅनेजर



**अन्नाचें रहस्य**





बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—गुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ

— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —





**किर्लोस्कर**

**अिलेक्ट्रिक पंपिंग सेट**

यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाळ टिकाऊ.
आपल्या विहिरींचे ओलिताचे करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारक काम करीत आहेत.
सविस्तर माहितीसाठीं लिहा.

किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी, द. सातारा

# अर्थ

बुधवार, ता. १५ जुलै, १९५९



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## राष्ट्रीयीकरणाच्या धोरणाचें मूल्यमापन

भारताचे मजूरमंत्री श्री. गुलझारीलाल नंदा हल्लीं परदेशांच्या दौऱ्यावर आहेत. ब्रिटनमध्यें जाण्यापूर्वी त्यांनीं युगोस्लाव्हिआ व पश्चिम जर्मनी ह्या देशांना भेटी दिल्या. ह्या देशांतील अर्थ-व्यवस्थेंत सार्वजनिक मालकीचा जो विभाग आहे तो कसा काय राबविण्यांत येत आहे ह्यासंबंधीं निरीक्षण करण्याच्या हेतूनें श्री. नंदा परदेशीं गेले आहेत. आपल्या दौऱ्यासंबंधीं बोलतांना ते म्हणाले कीं ब्रिटनमधील राष्ट्रीयीकरणाचा व त्यांच्या कारभाराचा अभ्यास फार उपयुक्त ठरला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेंतहि सार्व-जनिक मालकीचा विभाग असून त्याची उत्तरोत्तर वाढ व्हावी अशी सरकारची इच्छा आहे. ब्रिटनमधील औद्योगिक संबंध कशा प्रकारचे आहेत ह्यांचा अभ्यासहि महत्त्वाचा आहे. उद्योग-धंद्यांत कामगारांनीं सहभागी होण्याच्या दृष्टीनें असा अभ्यास विशेष महत्त्वाचा ठरतो. कामगारांना उद्योगधंद्यांत सहभागी करून घेण्यासाठी योग्य प्रकारचा कायदा करून घेण्याविषयीं भारता-मधील सर्व कामगारसंघांची एकवाक्यता आहे. ब्रिटनपुरतें बोलावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, समाजवादाची केवळ तात्त्विक बाजू सोडून दिली तरीसुद्धां ब्रिटनमध्यें राष्ट्रीयी-करणाचीं जीं पावलें टाकण्यांत आलीं तीं अनिर्वाह्य व चांगलीं अशींच होतीं. राष्ट्रीयीकरण झालें नसतें तर ब्रिटनमधील कोळशाच्या खाणी व रेल्वे वहातूक ह्यांची परिस्थिति सध्यां आहे त्यापेक्षा कितीतरी वाईट झाली असती. तथापि, राष्ट्रीयीकरणा-नंतर सर्वथैव प्रगतीच झाली आहे असें म्हणतां येणार नाहीं. अजूनहि सुधारणा होण्यास पुष्कळ वाव आहे. भारत राष्ट्रीयी-करणाच्या दिशेनें जीं पावलें टाकत आहे तीं बरोबर आहेत यासंबंधीं खात्री पटण्याइतका प्रगति ब्रिटनमध्यें झालेली आहे.

ह्याचा अर्थ असा नव्हे कीं, भारतांत राष्ट्रीयीकरण झालेल्या उद्योगधंद्यांचा कारभार पूर्ण समाधानकारक रीतीनें चालला आहे. राष्ट्रीयीकरणानंतर कामगारांनीं विशेष उत्साह दाखविलेला नाहीं किंवा परिस्थितींत पालट पडला असल्याची जाणीवहि त्यांच्यांत दिसून आलेली नाहीं पण, ब्रिटनमध्येंहि ह्या बाबतींत फारशी प्रगति झालेली दिसून येत नाहीं. ह्यावरून असें दिसतें कीं उद्योग-धंद्यांचे चालक आणि कामगार ह्या दोघांनींहि आपल्या वृत्तींत बदल केला पाहिजे युगोस्लाव्हिआंत ह्या बाबतींत चांगली प्रगति झालेली दिसते. त्या देशांत उद्योगधंद्यांच्या कारभारांत कामगार-मंडळें भाग घेतांना दिसतात. तेथील सरकारनें कामगारांची जाणीव बदलण्यासाठी शिक्षणाची जोरदार मोहीम चालू केली आहे. त्यामुळें कामगारांत आपण धंद्यांत भागीदार आहोंत अशी भावना निर्माण होऊं लागली आहे. अर्थात् अशी भावना निर्माण करण्याचें कार्य मंदगतीनेंच होत राहणार. भारतासारख्या देशांत उद्योगधंदे चालविण्याच्या बाबतींत कामगारांच्या सल्लामसलतीला व भागीदारीला फार महत्त्व आहे. कारण भारतामधील जीवनाचें मान येत्या कांहीं वर्षांत तरी फार सुधारण्याची शक्यता नाहीं. अशा परिस्थितींत कांहींहि करून उद्योगधंद्यांच्या कारभारांत आपलाहि हात आहे अशी भावना कामगारांत निर्माण करणें विशेष महत्त्वाचें आहे. भारताच्या सरकारनें जमिनीच्या मालकी-संबंधीं व मजुरांच्या प्रश्नांविषयीं जें धोरण नियोजित अर्थ-व्यवस्थेच्या चौकटींत स्वीकारलें आहे त्याचा स्वीकार देशांतील सर्व लोकांनीं केलेला आहे. पण अलीकडे मात्र कांहीं भिन्न मत-प्रवाहांचा प्रचार करण्यांत येऊं लागला आहे. ह्या मतप्रवाहांना नियोजित अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनें कांहीं अर्थ नाहीं. राजकारणाचा एक भाग म्हणूनच ह्या मतप्रवाहांचा निर्देश करावा लागेल.

---

## खाजगी व सार्वजनिक मालकीच्या विभागांचें सहकार्य

दिल्ली येथें सेंट्रल ॲड्व्हायसरी कौन्सिल ऑफ इंडस्ट्रीजच्या १० व्या बैठकीपुढें भाषण करतांना मध्यवर्ती सरकारचे उद्योग व व्यापारमंत्री श्री. लाल बहादुर शास्त्री ह्यांनीं खाजगी मालकीच्या व सार्वजनिक मालकीच्या विभागांच्या सहकार्याची जरूरी प्रतिपादन केली. ते म्हणाले कीं, भारताच्या अर्थव्यवस्थेंत खाजगी मालकीचा व सार्वजनिक मालकीचा असे दोन विभाग आहेत. मिश्र स्वरूपाच्या अर्थव्यवस्थेंत असें असतेंच. ह्या दोन्ही विभागांनीं आपआपली उत्पादनाची व्यवस्था परस्परांशीं सुसंगत व सहकार्यावर आधारलेली ठेवली पाहिजे. उभय विभागांत एक प्रकारची स्नेहपूर्ण स्पर्धा चालली आणि प्रत्येक विभागानें आपली श्रेष्ठता स्थापन करण्याचा प्रयत्न केला तर एकूण उत्पन्नांत वाढच होईल. खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांकडे सरकार सहा-नुभूतीनें पहात नाहीं असा आरोप करण्यांत येतो. परंतु, दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत खाजगी मालकीच्या विभागाचा जो विस्तार झाला आहे त्यावरून हा आरोप खरा नाहीं असेच दिसेल. आर्थिक सत्ता आणि संपत्ति ह्यांचें कांहीं थोड्या लोकांच्या हातीं केंद्रीकरण होऊं नये म्हणून सरकारनें कांहीं उद्योगधंदे खाजगी विभागांतच ठेवले आहेत. देशांतील लाखों बेकार तरुणांना रोजगार पुरविणें अवश्य आहे. त्या दृष्टीनें छोट्या उद्योगधंद्यांच्या सुसंगत विकासाची एखादी योजना हातीं घेण्यांत आली पाहिजे. मोठ्या कारखानदारांना ह्या बाबतींत साह्य करतां येण्यासारखें आहे. त्यांनीं आपले बडे धंदे चालवितांना लागणाऱ्या सर्व वस्तू स्वतःच तयार करण्याचें प्रयत्न करूं नयेत. त्यापेक्षा ह्या वस्तू तयार करण्याचें काम छोट्या उद्योगधंद्यांवर सोंपवावें. ह्या धोरणामुळें छोट्या उद्योगधंद्यांचा विकास साधेल, आणि त्यांच्या मालाच्या दर्जातहि सुधारणा करणें शक्य होईल.

---

**चष्म्यांना लागणाऱ्या कांचा**—चष्म्यांना, दुर्बिणींना व शास्त्रीय उपकरणांना लागणाऱ्या काचा तयार करण्याच्या कार-खान्यासंबंधींचा अहवाल रशिअन तज्ज्ञाकडून मध्यवर्ती सरकार-कडे आला आहे. हा कारखाना पश्चिम बंगालमध्यें दुर्गापूर येथें काढण्यांत यावयाचा आहे कारखान्यासाठी रशिआनें ५० कोटी रुबल्सचें कर्ज देऊं केलें आहे. कारखान्यांत दरसाल २०० टन वजनाच्या काचा तयार होऊं शकतील.

## ला. इं. कॉर्पोरेशनच्या मूल्यमापनाचा अहवाल

लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनच्या ३१ डिसेंबर, १९५७ रोजींचा मूल्यमापनाचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे, त्यांत ५६ लक्ष विमा पॉलिसी धारण करणारांचा हितसंबंध आहे. मूळ कंपन्यांच्या पॉलिसींवर त्या त्या कंपनीच्या परिस्थितीला अनुसरून बोनस जाहीर करण्यांत आला आहे. हें धोरण योग्य असेंच आहे; शक्यतितक्या जास्त कंपन्यांच्या विमेदारांना बोनस मिळावा, ह्या दृष्टीनें कॉर्पोरेशननें विशेष चांगल्या कंपन्यांच्या आर्थिक सुबत्तेचा थोडाफार उपयोग केलेला दिसतो. विमेदारांच्या मृत्यूंचें प्रमाण अपेक्षेपेक्षा कमी आढळलें आहे. मूल्यमापनांत ३–१/८% व्याजाचा दर गृहीत धरला आहे; पूर्वीच्या मूल्यमापनांतील सरासरी दरापेक्षा हा सुमारें १/२% नें जास्त आहे. त्यामुळें वाढाव्यांत ८ ते १० कोटी रुपयांची भर पडली आहे. १९५३ ते ५७ ह्या मुदतींत व्याजाचे दर चढीचे राहिले, हें खरें आहे; पण आतां व्याजाचे दर थोडे उतरण्याची प्रवृत्ति आढळून येते; आणि ला. इं. कॉर्पोरेशननें अर्धा टक्का जास्त व्याजाचा दर गृहीत धरणें योग्य केलें किंवा नाहीं हें येत्या एक–दोन वर्षांतील व्याजाच्या दरांवरून दिसून येईल. खर्चाचें ह्यापुढें प्रमाण काय राहील, ह्याचा अंदाज करून त्याप्रमाणें तरतूद करण्यांतहि कॉर्पोरेशननें काटकसरीविषयीं आशा बाळगलेली दिसते. मूल्यमापनांत नफ्यासह पॉलिसींचे बाबतींत २०% आणि नफ्याविरहित पॉलिसींचे बाबतींत १६% खर्च पुरेल, असें गृहीत धरलें आहे; गेल्या मूल्यमापनांतील प्रत्यक्ष अनुभव सांगतो, कीं ह्यापेक्षा जास्त खर्च आलेला आहे. खर्चाचा अंदाज कमी धरल्यामुळें मूल्यमापनांतील वाढाव्यांत १५ कोटी रुपयांची भर पडली असण्याचा संभव आहे. रिन्युअल खर्चाचें प्रमाण (१५·८९%) भारी असल्याचें कॉर्पोरेशननेंच कबूल केलें आहे; हें प्रमाण १२–१/२% पर्यंत खालीं आणावें लागेल.

## बॉम्बे स्टेट फिनॅन्स कॉर्पोरेशनचा अहवाल

दि बॉम्बे स्टेट फिनॅन्स कॉर्पोरेशनकडे १९५८–५९ मध्यें ३·२ कोटी रु. कर्जासाठी ९७ अर्ज आले. त्यांपैकी ६२·४ लक्ष रुपयांचे २७ अर्ज कॉर्पोरेशननें मंजूर केले आणि फक्त २१·९ लक्ष रुपयांचें कर्ज प्रत्यक्ष वाटलें. लहान आकाराच्या उद्योगधंद्यांना मुंबई सरकारचे एजंट ह्या नात्यानें कॉर्पोरेशननें ३·८ लक्ष रुपयांचें कर्ज वाटलें; १·२ कोटी रु. कर्जासाठी २३१ अर्ज आले होते आणि ११·९ लक्ष रुपयांचे ३२ अर्ज मंजूर झाले होते.

१९५६–५७ मध्यें कॉर्पोरेशननें ७५·५ लक्ष रुपयांचें कर्ज वाटलें होतें; १९५८–५९ मध्यें ती रक्कम २१·९ लक्ष रुपयांवर उतरली. बाँड्सच्या स्वरूपांत कॉर्पोरेशनन १९५७–५८ मध्यें जेवढी रक्कम उभारली, तिच्यापेक्षाहि जास्त रक्कम न गुंतता पडून आहे! कर्जपुरवठ्यासाठी निर्माण केलेल्या ह्या संस्थेच्या अहवालापासून बराच बोध घेण्याजोगा आहे. भांडवलाचा तुटवडा भासणारे उद्योगधंदे पुरेसें तारण योग्य मुदतींत देऊं शकत नाहींत; लहान आकाराच्या उद्योगधंद्यांची गरज भागविणें कठीण जातें आणि कॉर्पोरेशनला आपले फंड गुंतविण्यास अडचण पडत आहे.

## नाणीं पाडण्यांतील आंतबट्टा

सिक्युरिटी प्रिंटिंग प्रेस आणि टांकसाळी ह्यांचे कारभाराविषयीं एस्टिमेट्स कमिटीनें व्यक्त केलेलें मत अर्थखात्याची बदनामी करणारें आहे. कारण, हें खातें इतर खात्यांच्या खर्चावर नियंत्रण ठेवतें, पण स्वतःच्या खात्यांतील परिस्थितीकडे त्याचें पुरेसें लक्ष दिसत नाहीं. उदाहरणार्थ, नवे पैसे पाडण्यांत खोट येत आहे. १० रुपये दर्शनी किंमतीचे नवे पैसे तयार करण्यास १४ रु. खर्च येतो; त्याचप्रमाणें दोन नव्या पैशांच्या २० रु. दर्शनी किंमतीच्या नाण्यांचा उत्पादनखर्च २९ रु. आहे. टांकसाळीच्या कामाचे साप्ताहिक तास ३७½ आहेत; ऑर्डनन्स फॅक्टरींत ते ४४½ असतात. चांदी शुद्ध करण्याच्या रिफायनरीच्या उपक्रमावर कमिटीनें ताशेरे झाडले आहेत. १९५१ मध्यें सुरू व्हावयाची रिफायनरी अजून सुरू झालेली नाहीं. नाशिकच्या सिक्युरिटी प्रिंटिंग प्रेसच्या मास्टरला 'इन्टॅग्लिओ' ह्या खर्चिक पद्धतीचा अभ्यास करण्यासाठीं युरोपला पाठविण्यांत आलें. ही पद्धत नाशिकच्या प्रेसमध्यें चालू नव्हती. मास्टरनें स्वित्झरलंड, ऑस्ट्रिआ आणि इंग्लंड ह्या देशांत दौरा केला आणि स्वदेशीं परत आल्यावर तो सेवानिवृत्त झाला! त्याच्या दौऱ्याचा अहवाल उपलब्ध नाहीं; प्रेसच्या मार्गदर्शनासाठीं त्यानें कांहीं लिहूनहि ठेवलेलें नाहीं!

## सौराष्ट्र स्टेट को. बँकेसाठीं आठ कोटी रु. ची हमी

मुंबई सरकारनें राजकोट येथील सौराष्ट्र स्टेट ऑपरेटिव्ह बँकेला १९५९–६० सालीं रिझर्व्ह बँकेकडून ८ कोटी रुपयांचें अल्प मुदतीचें कर्ज मिळण्याच्या बाबतींत हमी दिली आहे. सदरहू संस्थेशीं संलग्न असलेल्या सहकारी संस्थांना, शेती हंगामांतील शेतीच्या कामांसाठीं किंवा पिकांची विक्री करण्यासाठीच सदरहू संस्थेनें रकमेंतून कर्जें द्यावयाचीं आहेत. सदरहू को–ऑपरेटिव्ह बँकेला ही कर्जाची रक्कम हप्त्याहप्त्यानें मिळेल. हप्ता मिळाल्यापासून दोन टक्के व्याजाच्या दरानें एक वर्षांत त्याची परतफेड करावी लागेल. व्याजाच्या सवलतीचा हा फायदा मुंबई राज्याचे रजिस्ट्रार ऑफ को–ऑपरेटिव्ह सोसायटीज अथवा त्यांनीं अधिकार दिलेल्या अन्य अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार कर्जदारांना देण्यांत येईल.

## बचत सर्टिफिकिटें ट्रेझरीमध्यें ठेवण्याची सोय

नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें विकत घेणाऱ्यांना ट्रेझरीज आणि सबट्रेझरीजमध्यें आपलीं सर्टिफिकिटें सुरक्षित ठेवण्याची केंद्र सरकारनें आतां परवानगी दिली आहे. त्यानुसार एखाद्या इसमानें सर्टिफिकिटें सुरक्षित ठेवण्यासाठीं आणून दिल्यास त्यांचा स्वीकार करण्यांत यावा, अशा आशयाच्या सूचना मुंबई सरकारनें मुंबई राज्यांतील ट्रेझरी व सबट्रेझरी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. अल्पबचत मोहिमेस उत्तेजन देण्यासाठीं सरकारनें ज्या अनेक सोयी करून दिल्या आहेत त्यांपैकीं ही एक आहे. मात्र सर्टिफिकिट सुरक्षित ठेवण्यासाठीं प्रत्यक्ष देण्यापूर्वी बचतदारानें ट्रेझरी ऑफिसर किंवा संबंधित ट्रेझरीच्या अव्वल कारकुनाकडे तसा अर्ज केला पाहिजे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

### कर्जांचें ठेवींशीं प्रमाण – बँकिंग कंपन्यांची छाननी
(१९५८ अखेर)

| कर्जाचें ठेवींशीं प्रमाण % | शेड्यूल्ड बँका | बिगर शेड्यूल्ड बँका | सर्व बँका |
|---|---|---|---|
| ३१ पेक्षा कमी | ४ | ११ | १५ |
| ३१ ते ५० | २१ | १८ | ३९ |
| ५१ ते ७० | ४३ | ७९ | १२२ |
| ७१ ते १०० | १५ | १०३ | ११८ |
| १०० चे वर | १० | ८१ | ९१ |
| एकूण... | ९३ | २९२ | ३८५ |

### शेड्यूल्ड व बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्या
१९४६ ते ५८

| | शेड्यूल्ड बँका | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | स्टेट बँक ऑफ इंडिया | विदेशी बँका | हिंदी शेड्यूल्ड बँका | एकूण | बिगर शेड्यूल्ड बँका | सर्व बँका |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १९४६ | ३५८ | ५८ | २,४४१ | २,८५७ | २,०२९ | ४,८८६ |
| १९४७ | ३६२ | ८० | २,५४५ | २,९८७ | १,८३२ | ४,८१९ |
| १९४८ | ३६७ | ७४ | २,५२२ | २,९६३ | १,७११ | ४,६७४ |
| १९४९ | ३७७ | ७६ | २,३९९ | २,८५२ | १,५८९ | ४,४४१ |
| १९५० | ३८२ | ६६ | २,३१७ | २,७६५ | १,५४५ | ४,३१० |
| १९५१ | ३९१ | ६४ | २,१९१ | २,६४६ | १,४७३ | ४,११९ |
| १९५२ | ४०८ | ६४ | २,१९९ | २,६७१ | १,३६९ | ४,०४० |
| १९५३ | ४२२ | ६७ | २ १८१ | २,६७० | १,२५१ | ४,०२१ |
| १९५४ | ४५३ | ६५ | २,२२८ | २,७४६ | १,२८६ | ४,०३२ |
| १९५५ | ४८० | ६६ | २,२९२ | २,८३८ | १,२४७ | ४,०८५ |
| १९५६ | ३३६ | ६७ | २,३५० | २,९५३ | १,२४० | ४,१९३ |
| १९५७ | ६२० | ६७ | २,५७६ | ३,२६३ | १,११२ | ४,३७५ |
| १९५८ | ७१० | ६६ | २,८४१ | ३,६१७ | ९९९ | ४,६१६ |

**औद्योगिक शांतता राखण्याचा करार**—बंगलोर येथील रेडिओ इलेक्ट्रिक मॅन्युफॅक्चरिंग कंपनी आणि त्यांत काम करणारा कामगारवर्ग ह्यांच्यांत तीन वर्षेपर्यंत औद्योगिक शांतता राखण्याचा करार झाला आहे. जपानी तंत्रज्ञांच्या साह्यानें ह्या कारखान्याचा विस्तार लवकरच करण्यांत येणार आहे. कारखान्याला सरकारची मदत आहे. नव्या करारामुळें ६०० कामगारांचा फायदा होणार आहे.

**आदिवासींसाठी घरांची बांधणी**—मध्यप्रदेशांतील महाकोशल व विंध्यप्रदेशांतील भागांत आदिवासींची वस्ती बरीच आहे. ह्या लोकांची राहण्याची सोय करण्यासाठी मध्यप्रदेश सरकारनें सुमारें ९ लाख रुपये खर्च येणारी एक योजना तयार केली आहे. योजनेप्रमाणें १,१०० आदिवासी कुटुंबाची सोय करण्यांत येईल. राज्य सरकारला मध्यवर्ती सरकार साह्य करणार आहे.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
समासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.
पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : २४८३.

सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यांवरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | $2\frac{1}{2}$ टक्के |
| २ वर्षे | : | $2\frac{3}{4}$ टक्के |
| ३ वर्षे | : | ३ टक्के |
| ५ वर्षे | : | $3\frac{1}{2}$ टक्के |
| १० वर्षे | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींचे दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ३१–७–५७
वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक गृह, गिरगांव मुंबई ४.

भारतांतील सर्व केंद्रांतून व्यापारी लोकांच्या हुंड्या व रेल्वे रिसिट यांची वसुली माफक दरानें केली जाते.

शाखा : फोर्ट, दादर, माहिम, पार्ली, पुणें, बेळगांव
महिला शाखा : सारस्वत बँक गृह, गिरगांव मुंबई ४.

## बँकांचीं मध्यम व लहान उद्योगधंद्यांना कर्जे

लहान उद्योगधंद्यांना कर्जपुरवठा होण्याच्या मार्गांत अनेक अडचणी आहेत. ते पुरेसें तारण देऊं शकत नाहींत. त्यांच्यांत गुंतलेल्या भांडवलाच्या मानानें उत्पादनाचें प्रमाण कमी असतें. धंद्याच्या किफायतशीरपणाची खात्री सांगतां येत नाहीं; तयार मालाच्या मागणीविषयीं अंदाज बांधतां येत नाहीं. लहान उद्योगधंद्यांना कर्ज देणें बँकांना सुरक्षित न वाटण्याचा संभव असतो. मोठ्या बँकांना लहान उद्योगधंद्यांविषयीं आस्था वाटत नाहीं. त्यामुळें, लहान उद्योगधंद्यांना खासगी सावकारांकडे पैशाची व्यवस्था करणें भाग पडतें. कर्जावरील व्याजाचा दर जबर असल्यानें, त्यांच्या प्रगतीस अडथळा येतो. व्यापारी बँकांना लहान उद्योगधंद्यांकडे लक्ष देण्यास उद्युक्त कसें करतां येईल, हा खरा प्रश्न आहे.

बँकांकडून लहान- उद्योगधंद्यांना सध्यां किती कर्जपुरवठा होतो, ह्याविषयीं निश्चित आंकडे उपलब्ध नाहींत. म्हणून, रिझर्व्ह बँकेनें एक पहाणी केली. कांहीं शेड्यूल्ड व बिगर–शेड्यूल्ड बँकांची नमुने म्हणून निवड करण्यांत आली. ५६६ शाखा असलेल्या ७४ शेड्यूल्ड बँका आणि २४४ शाखा असलेल्या १५१ बिगर–शेड्यूल्ड बँका, अशा ८०० शाखा असलेल्या २२५ बँकांकडून ठराविक फॉर्मवरती माहिती मागविण्यांत आली. ज्याची एकूण जिंदगी ५ लक्ष रुपयांपेक्षा कमी आहे, त्याला लहान उद्योगधंदा समजावें व ५ ते २५ लक्ष रुपयांची जिंदगी असलेल्याला मध्यम उद्योगधंदा समजावें, असें ह्या पहाणीपुरतें ठरविण्यांत आलें. पहाणीमधील आंकडे ३० सप्टेंबर, १९५७ रोजींचे आहेत.

पहाणीच्या कक्षेंतील बँकांनीं तारणावर व तारण न घेतां ५६·८ कोटी रुपये कर्जाऊ दिले होते; त्यावरून सर्व बँकांनीं दिलेल्या कर्जाची रक्कम अंदाजें २५६·८ कोटी रुपये भरेल. त्यापैकीं शेड्यूल्ड बँकांनीं दिलेलीं २४१·८ कोटी रुपयांची व बिगर–शेड्यूल्ड बँकांनीं दिलेलीं १५·० कोटी रुपयांचीं असणार ह्याचा अर्थ, शेड्यूल्ड बँकांनीं दिलेल्या एकूण कर्जापैकीं ३०% रक्कम लहान व मध्यम आकाराच्या उद्योगधंद्यांना मिळाली; बिगर शेड्यूल्ड बँकांच्या बाबतींत तें प्रमाण ५१% भरतें. दिलेल्या कर्जापैकी ८०% तारणावरील होतें २५६·८ कोटी रुपयांच्या अंदाजी कर्जापैकीं सर्वांत जास्त (७७·१ कोटी रु.) मुंबईंत दिलेलें होतें. त्याच्या खालोखाल प. बंगाल (३८·६ कोटी रु.), मद्रास (२२·७ कोटी रु.), म्हैसूर (२१·५ कोटी रु.), उत्तर प्रदेश (१४·३ कोटी रु.) आणि पंजाब (१३·९ कोटी रु.) असा अनुक्रम लागतो. कर्जापैकी ७८% कर्ज व्यापारासाठी आणि १८% कर्ज कारखानदारीसाठीं देण्यांत आलें.

**बँकांचीं कर्जे – राज्यवार आंकडे**
**( लक्ष रुपये )**

| राज्य | | शेड्यूल्ड बँका | बिगर शेड्यूल्ड बँका | सर्व बँका |
|---|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश | ... | ५,८८ | — | ५,८८ |
| आसाम | ... | १,८६ | — | १,८६ |
| बिहार | ... | ५,८३ | ५ | ५,८८ |
| मुंबई | ... | ७६,४२ | ५३ | ७६,९५ |
| केरळ | ... | १०,२८ | ७,५८ | १७,८६ |
| मध्य प्रदेश | ... | ४,२३ | ११ | ४,३४ |
| मद्रास | ... | १९,९१ | २,८२ | २२,७३ |
| म्हैसूर | ... | १९,५२ | १,९४ | २१,४६ |
| ओरिसा | ... | ६३ | २ | ६५ |
| पंजाब | ... | १३,९१ | — | १३,९१ |
| राजस्थान | ... | ४,४३ | ३५ | ४,७८ |
| उत्तर प्रदेश | ... | १३,४६ | ८० | १४,२६ |
| प. बंगाल | ... | ३८,०० | ५८ | ३८,५८ |
| इतर राज्यें | ... | २७,०० | ३० | २७,७० |
| सर्वंद भारत | ... | २४१,६७ | १५,०७ | २५६,८४ |

**बँकांचीं कर्ज – तारणवार आंकडे**
**( लक्ष रुपये )**

| तारणाचा प्रकार | | शेड्यूल्ड बँका | बिगर शेड्यूल्ड बँका | सर्व बँका |
|---|---|---|---|---|
| तारणावरील कर्जे | | | | |
| १ डॉक्युमेंटरी बिल्स | ... | २६,६० | २९ | २६,८९ |
| २ जमीन, इमारती | ... | ९,६७ | ३,१८ | १२,८५ |
| ३ यंत्रसामुग्री | ... | १,९७ | ३२ | २,२९ |
| ४ कच्चा माल | ... | ९,४१ | ४० | ९,८१ |
| ५ पक्का माल | ... | १०,८६ | १३ | १०,९९ |
| ६ सरकारी रोखे, शेअर्स | ... | १९,९६ | ४४ | २०,४० |
| ७ मुदती ठेवी | ... | ६,७८ | ९४ | ७,७२ |
| ८ तयार माल | ... | ९८,२७ | २,९४ | १०१,२५ |
| ९ सोनें, चांदी, दागिने | ... | २,५१ | ७६ | ३,२७ |
| १० इतर | ... | ३,२२ | ७१ | ३,९३ |
| तारणावरील | ... | १९६,५७ | १०,८६ | २०७,४४ |
| तारण नसलेली | ... | ४५,१९ | ४,२० | ४९,३९ |
| एकूण | ... | २४१,७७ | १५,०७ | २५६,८४ |

**मॉस्कोंत रशिअन अनुबोधपट**—मॉस्को येथें पुढील महिन्याच्या प्रारंभापासून एक आंतरराष्ट्रीय बोलपटमहोत्सव सुरू होणार आहे. ह्या महोत्सवांत भारतांतील मंडळीना व त्यांतील लोकांचें जीवन दाखविणारा एक हिंदी अनुबोधपट दाखविण्यांत येणार आहे. बोलपटांत भिलई येथें रशिआच्या मदतीनें उभारण्यांत येणाऱ्या पोलादाच्या कारखान्याचाहि अंतर्भाव आहे.

**युरोपांत उष्णतेची लाट**—चालू महिन्याच्या पहिल्या आठवड्याअखेर युरोप व ब्रिटनमध्यें उष्णतेची लाट येऊन तपमान १०० अंशांच्या जवळ गेलें. ब्रिटनमधील एका टेलिव्हिजनच्या कारखान्यांतील ८० कामगार मुली बेशुद्ध पडल्या. चॉकोलेटच्या एका कारखान्यानें चॉकोलेटच्या अर्धा वड्या वितळल्यामुळें कामगारांना घरीं पाठवून दिलें.

**धूम्रपानामुळें कॅन्सर होतोच**—ब्रिटिश मेडिकल रिसर्च असोसिएशन ह्या संस्थेनें असा अभिप्राय व्यक्त केला आहे कीं, धूम्रपान न करणाऱ्या लोकांपेक्षा धूम्रपान करणाऱ्या लोकांत फुफुसाच्या कॅन्सर होण्याचा अधिक संभव असतो. ह्या बाबतींत अजून निर्णायक पुरावा हातीं आलेला नाहीं असें कांहीं इतर तज्ज्ञांचें मत आहे.

**टॅक्सींच्या मीटर्सची आयात घटली**—टॅक्सींवर लावण्यांत येणाऱ्या प्रवास मोजण्याच्या मीटर्सच्या आयातींत घट झाली आहे. १९५७ सालीं भारतांत १,४०० मीटर्स आयात करण्यांत आले. त्यांची किंमत ३,८२,००० रुपये झाली. १९५८ मध्यें ५६० मीटर्स आयात करण्यांत आले. त्यांची किंमत १,८९,००० रुपये झाली. मीटर्स पश्चिम जर्मनी व जपानकडून घेतले जातात.

## कंपनी कायद्याचें १७१ वें कलम

### मध्यप्रदेश हायकोर्टाचा निवाडा

ईस्टर्न ऑटोमोबाईल सिंडिकेट या कंपनीला बाबू राजेंद्र कुमारसिंग या इसमानें २६,००० रुपये कर्ज दिलें. कंपनीच्या मॅनेजिंग डायरेक्टरनें त्या कर्जाची हमी दिली. त्या कर्जापैकी कांहीं कर्ज कंपनीनें फेडलें. १५,४६९ रु. ८ आणे ३ पै या बाकी राहिलेल्या रकमेकरितां बाबू राजेंद्र कुमारसिंग यानें कंपनीविरुद्ध दावा आणला. २६,००० रुपये आपण कर्ज घेतलें ही गोष्ट कंपनीनें नाकबूल केली परंतु त्याचा कांहीं उपयोग न होऊन बाबू राजेंद्र कुमारसिंगला कोर्टानें डिक्री दिली. या डिक्रीविरुद्ध कंपनी आणि तिचा मॅनेजिंग डायरेक्टर यांनीं अपील केलें.

हें अपील चालू असतांना कंपनीचें दिवाळें निघून कंपनीचा कारभार गुंडाळण्याचा हुकूम कोर्टानें दिला. कंपनीनें डिक्रीच्याविरुद्ध दाखल केलेलें अपील चालू ठेवण्याला बाबू राजेंद्र कुमारसिंगनें एक प्राथमिक स्वरूपाची हरकत घेतली. १९१३ सालच्या कंपन्यांच्या कायद्याच्या कलम १७१ खालीं वरील अपील चालू ठेवण्याला कोर्टाच्या परवानगीची आवश्यकता आहे; त्या परवानगीशिवाय तें अपील चालू ठेवतां येत नाहीं असें बाबू राजेंद्रकुमारसिंगचें म्हणणें होतें.

१९१३ सालच्या कंपन्यांच्या कायद्याच्या कलम १७१ खालीं कोर्टाच्या परवानगीशिवाय वरील अपील चालू ठेवितां येतें किंवा नाहीं हा हायकोर्टापुढील मुख्य प्रश्न होता.

१९१३ सालच्या कंपन्यांच्या कायद्याच्या क. १७१ चा आशय पुढीलप्रमाणें आहे—

"कंपनीचा कारभार गुंडाळण्याचा हुकूम दिल्यावर अथवा तात्पुरत्या लिक्विडेटरची नेमणूक झाल्यावर कोर्टाच्या परवानगीशिवाय कंपनीविरुद्ध कोणताहि दावा किंवा कारवाई करतां येणार नाहीं "

कोर्टाच्या देखरेखीखालीं कंपनी गुंडाळण्याचा हेतु असा आहे कीं, कंपनीला लोकांकडून पैसे घेणें आहेत ती रक्कम योग्य रीतीनें वसूल व्हावी आणि कंपनी ज्या लोकांना देणें लागतें त्या लोकांमध्यें त्या रकमेचें योग्य वांटप व्हावें. सावकार लोकांनीं कंपनीविरुद्ध एकच गिल्ला करून कंपनीला त्रास देऊं नये आणि त्यांच्यामध्यें कंपनीच्या मालमत्तेचें योग्य वांटप व्हावें या दृष्टीनें कंपनीच्या मालमत्तेचें संरक्षण करण्याचा क. १६९, १७१ व २३२ चा उद्देश आहे.

यावरून असें दिसून येईल कीं, कंपनीविरुद्ध दावा किंवा कोर्टकारवाई करावयाची असेल तर कोर्टाच्या परवानगीची आवश्यकता आहे. कंपनीनें इतरांविरुद्ध केलेल्या कारवाईला मात्र कोर्टाच्या परवानगीची आवश्यकता नाहीं. कंपनीच्या ऋणकोविरुद्ध जर कंपनीला दावा किंवा कोर्टकारवाई करावयाची असेल अथवा तो दावा अथवा कारवाई चालू ठेवावयाची असेल तर त्याकरितां कोर्टाच्या परवानगीची जरूर नाहीं. कंपनीविरुद्ध ज्या कुणाला दावा आणावयाचा असेल अथवा कोर्टकारवाई करावयाची असेल तर त्याला मात्र तसें करावयास कोर्टाची परवानगी आणावी लागेल.

प्रस्तुत मामल्यांत बाबू राजेंद्रकुमारसिंगनें कंपनीचें दिवाळें वाजण्यापूर्वीच कंपनीविरुद्ध डिक्री मिळविली होती. त्या डिक्रीविरुद्ध कंपनीनें अपील केलें. तें अपील चालू असतांना कंपनीचें दिवाळें निघून कंपनीचा कारभार गुंडाळण्याविषयीं हुकूम देण्यांत आला. अशा परिस्थितींत डिक्रीविरुद्ध कंपनीनें केलेलें अपील पुढें चालू ठेवण्यास कोर्टाच्या परवानगीची आवश्यकता नाहीं असा निकाल देऊन अपिलाची पुढील कारवाई करण्यांत यावी असा हुकूम हायकोर्टानें दिला.

सारांश—कंपनीचें दिवाळें निघून तिचा कारभार गुंडाळण्याचा हुकूम निघाल्यावर कोर्टाच्या परवानगीशिवाय कोणालाहि कंपनीविरुद्ध दावा किंवा कोर्टकारवाई करतां येत नाहीं. कंपनीचें दिवाळें निघण्यापूर्वीच जर एखाद्या सावकारानें कंपनीविरुद्ध दावा आणून डिक्री मिळविली असली आणि त्या डिक्रीविरुद्ध कंपनीनें केलेलें अपील चालू असतांना जर कंपनीचें दिवाळें निघालें आणि कंपनीचा कारभार गुंडाळण्याचा हुकूम देण्यांत आला तर अशा परिस्थितींत डिक्रीविरुद्ध कंपनीनें केलेलें अपील पुढें चालू ठेवण्यास कोर्टाच्या परवानगीची आवश्यकता नाहीं.

—"न्यायबोध," मे, १९५९

---

### गव्हाच्या दर एकरीं उत्पादनांत वाढ

भारतांत १९५८–५९ मध्यें ३,०९,६६,००० एकर जमिनींत गव्हाच्या पिकाची लागवड होऊन त्यापासून ९·६९ दशलक्ष टन उत्पादन झालें आहे. गेल्या पांच वर्षांतील या पिकाच्या लागवडीखालील क्षेत्रफळाच्या व उत्पादनाच्या सरासरीपेक्षा हे आंकडे अनुक्रमें १५,२५,००० एकरांनीं अथवा ४·९ टक्क्यांनीं व १२,०१,००० टनांनीं अथवा १४·१ टक्क्यांनीं जास्त आहेत.

१९५७–५८ च्या २,९३,००,००० एकर व ७७,४१,००० टन या आंकड्यांशीं तुलना करतां यंदाचे हेच आंकडे अनुक्रमें १६,६६,००० एकरांनीं अथवा ५·७ टक्क्यांनीं व १९,५३,००० टनांनीं अथवा २५·२ टक्क्यांनीं जास्त आहेत.

या वर्षीच्या या पिकाच्या उत्पादनाचें एक वैशिष्ट्य म्हटलें म्हणजे एकरीं उत्पादनांत झालेली वाढ. १९५७–५८ चे एकरीं उत्पादन ५९२ रत्तल होतें; तें या वर्षी ७०१ रत्तलांवर गेलें आहे.

ही वाढ प्रामुख्यानें मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, पंजाब, राजस्थान, बिहार आणि जम्मू व काश्मीर राज्यांत झाली असून रबी पीक मोहिमेंत करण्यांत आलेले प्रयत्न त्यास कारणीभूत आहेत. विशेषतः मुंबई राज्यांतील रबी पीक मोहिमेमुळें गतवर्षीशीं तुलना करतां यंदा या राज्यांतील सदर पिकाच्या उत्पादनांत २,१७,००० टनांनीं वाढ झाली आहे.

---

**साखरेच्या किंमती उतरविणार**—इंडिअन शुगर मिल्स असोसिएशनच्या कमिटीची सभा दिल्ली येथें भरली होती. साखरेच्या किंमती उतरविण्याची एक योजना असोसिएशनतर्फे सरकारला सादर करण्यांत येणार आहे. कमिटीनें असें मत व्यक्त केलें आहे कीं, कोणत्याहि परिस्थितींत ग्राहकाला एक शेर साखरेसाठीं १ रुपयापेक्षा अधिक पैसे द्यावे लागूं नयेत.

**औद्योगिक शांतता राखण्याचा करार**—एर्नाकुलम येथील पेट्रोलच्या तीन कंपन्या आणि त्यांत काम करणारे कामगार ह्यांच्यांत तीन वर्षेपर्यंत औद्योगिक शांतता पाळण्याचा करार झाला आहे. ह्या करारांत वेतनश्रेणी, महागाईभत्ता, बोनस, इत्यादीं बाबींचा समावेश आहे. सुमारें १,००० कामगार व कारकून ह्यांना कराराचा फायदा मिळेल.

## कंपन्यांनीं शेअर सर्टिफिकिटें देण्यासंबंधीं नियम

### लबाडीस आळा घालण्याचा उद्देश

भारत सरकारनें कंपनी कायद्याखालीं शेअर सर्टिफिकिटें देण्याच्या पद्धतीचें नियमन करण्यासाठीं नियम तयार केले आहेत. सदर नियमान्वयें, इतर अनेक बाबींबरोबरच शेअर सर्टिफिकिटें कंपनीच्या संचालक मंडळाचा ठराव झाल्यानंतरच देतां येतील आणि या सर्टिफिकिटांचे फॉर्म व इतर संबंधित कागदपत्रें सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी कंपनीच्या निवडक अधिकाऱ्यांवर राहील. गहाळ झालेल्या सर्टिफिकिटांच्या दुसऱ्या नकला देणें यासारख्या इतरहि अशाच स्वरूपाच्या बाबींचा परामर्ष या नियमांत घेण्यांत आलेला आहे.

कंपन्यांकडून कांहींच विचार न करतां शेअर सर्टिफिकिटांची दुसरी वा तिसरी नकल देण्याच्या वा कधीं कधीं तर लबाडीनें त्या देण्याच्या पद्धतीस आळा बसावा या हेतूनें हे नियम करण्यांत आले आहेत. सदर नियम तयार करतांना महत्त्वाच्या चेंबर्स ऑफ कॉमर्सचा सल्ला घेण्यांत आला होता.

प्रचलित कंपनी कायद्यांत योग्य त्या दुरुस्त्या करून शेअर सर्टिफिकिटें देण्यासंबंधींच्या तरतुदी कडक करण्यांत येतील. सदर दुरुस्त्या कंपनीज (अमेंडमेंट) बिल, १९५९ मध्यें अंतर्भूत करण्यांत आल्या आहेत. सदर विधेयक तूर्त संसदेच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ आहे.

### विजेचा खेडोंपाडीं प्रसार

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत ३१ जानेवारी, १९५९ पर्यंत एकूण ७,९८५ खेड्यांतून विजेची सोय करण्यांत आली. यांपैकी १,४२९ खेड्यांत ही सोय १ ऑगस्ट, १९५८ नंतरच्या सहा महिन्यांत झालेली आहे. सदर सहा महिन्यांत इतर राज्यांपेक्षा मद्रास राज्य या बाबतींत आघाडीवर असून, त्या राज्यांत ६७९ खेड्यांतून वीज खेळूं लागली. आंध्र प्रदेश, पंजाब व केरळ या राज्यांतील अनुक्रमें १३३, १२९ व ११२ खेड्यांत तर मुंबई राज्यांतील ६४ खेड्यांत वीज आली.

### पब्लिक आणि प्रायव्हेट कंपन्या

सन १९५८-५९ मध्यें ५८ पब्लिक कंपन्यांची नोंदणी करण्यांत आली. १९५७-५८ मध्यें ६५ व १९५६-५७ मध्यें ८४ पब्लिक कंपन्या नोंदविण्यांत आल्या होत्या. सन १९५८-५९ मध्यें नोंदविण्यांत आलेल्या पब्लिक कंपन्यांचें अधिकृत भांडवल ५९ कोटी रुपये होतें. १९५७-५८ व १९५६-५७ चे हेच आंकडे अनुक्रमें ५१ कोटी रुपये व ५४ कोटी रुपये असे होते.

सन १९५८-५९ मध्यें नव्यानें नोंदणी झालेल्या कंपन्यांपैकीं २४० कंपन्या मुंबई राज्यांत नोंदविण्यांत आल्या.

### १९५८-५९ मध्यें १,०९५ नवीन कंपन्या

कंपनी कायद्याखालीं सन १९५८-५९ मध्यें १,०९५ नवीन कंपन्यांची नोंद झाली. १९५७-५८ आणि १९५६-५७ मधील हेच आंकडे अनुक्रमें ९६१ व ८४८ होते.

सन १९५८-५९ मध्यें नव्यानें नोंद दाखविण्यांत आलेल्या या कंपन्यांचें एकूण अधिकृत भांडवल २८४ कोटी रुपये होतें. १९५७-५८ व १९५६-५७ मधील हेच आंकडे अनुक्रमें १०३ कोटी रुपये व २११ कोटी रुपये असे होते.

## प्रॉव्हिडंट फंडाच्या पैशाची दशवार्षिक ट्रेझरी रोख्यांतील गुंतवणूक

### पन्नास हजारांची मर्यादा रद्द

सध्यां प्रॉव्हिडंट फंडाचे पैसे, १९२५ च्या प्रॉव्हिडंट फंड ॲक्टांतील तरतुदीनुसार, दशवार्षिक ट्रेझरी सेव्हिंग्ज डिपॉझिट सर्टिफिकिटांत ५०,००० रुपयांपर्यंत आणि द्वादशवार्षिक राष्ट्रीय योजना बचत रोख्यांत कितीहि रकमेपर्यंत गुंतवितां येतात. तथापि प्रॉ. फंडाचे पैसे ट्रेझरी सेव्हिंग्ज डिपॉझिट सर्टिफिकिटांत कितीहि मर्यादेपर्यंत गुंतविण्यास परवानगी असावी अशी सूचना करणारीं पत्रें वेळोवेळीं आलेलीं आहेत. म्हणून राष्ट्रीय योजना बचत रोख्यांस लागू असलेल्या तरतुदीप्रमाणें ट्रेझरी सेव्हिंग्ज डिपॉझिट सर्टिफिकिटांत कोणतीहि मर्यादा न ठेवतां पैसे गुंतविण्यास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यांत आला आहे. ही सवलत ४ जुलै, १९५९ पासून अंमलांत आली.

### बोटी घेण्यासाठीं सरकारची मदत हवी

इंडिअन नॅशनल स्टीमशिप ओनर्स असोसिएशनच्या अध्यक्ष श्रीमती सुमति मोरारजी इंग्लंडचा व पश्चिम युरोपचा चार आठवड्यांचा दौरा करून परत आल्या आहेत. भारतामधील बोटवाहतुकीच्या धंद्यासाठीं नव्या बोटी मिळविण्याबाबत त्यांना असा अनुभव आला कीं, युद्धकाळांत बांधल्या गेलेल्या व्यापारी बोटी मिळण्याची आतां फारशी शक्यता नाहीं. ह्याविषयीं आपले विचार व्यक्त करतांना त्या म्हणतात कीं भारतानें नव्या बोटी घेतांना त्या पांच वर्षांपेक्षा अधिक पूर्वी बांधलेल्या असतील तर घेऊं नयेत. नव्या बोटींचे मालक आपल्या बोटींची उशिरा किंमत देण्याच्या पद्धतीनें विक्री करण्यास उत्सुक नाहींत. त्यांना सर्व किंमत एकदम पाहिजे आहे. त्यांच्यापैकीं कांहींजण ह्या पद्धतीनें बोटी विकण्यास तयार असले तरी सर्व किंमत चुकती करण्याचा काळ तीन ते पांच वर्षांपेक्षा अधिक असण्यास त्यांचा विरोध आहे. बोटवाहतूक हा एक असा धंदा आहे कीं ज्या धंद्यांतील मालमत्ता ताब्यांत आल्याबरोबर तिच्या उपयोगानें परदेशीय चलनाची प्राप्ति होऊं लागते. नवीन बोट घ्यावयाची असल्यास सरकारच्या सध्यांच्या धोरणाप्रमाणें फक्त २० टक्के किंमतीचें परदेशीय चलन तातडतोब मिळूं शकतें आणि बाकीची किंमत ५ वर्षांत फेडावयाची असते. सरकारच्या ह्या धोरणामुळें भारतामधील बोट कंपन्यांना योग्य प्रकारच्या नव्या बोटी मिळविणें अशक्य होत आहे. म्हणून सरकारनें बोटीची रोख किंमत देण्यासाठीं अधिक प्रमाणांत परदेशीय चलन मंजूर करणें आवश्यक आहे. त्याचप्रमाणें, राहिलेली बाकी देण्यासाठींहि कमी अवधींत परदेशीय चलनाची व्यवस्था केली पाहिजे. ब्रिटनमधील बोट-बांधणीच्या कंपन्या उशिरा किंमत घेण्याच्या अटीवर कोणासाठीं बोटी बांधण्यास फारशा उत्सुक नाहींत.

**अजंठा लेण्यांत रशिआचा नकाशा**—अजंठा लेण्यांतील एका गुंफेंत रशिअन प्रदेशाचा नकाशा आढळून आला असून त्यावर अस्वलाची प्रतिकृति आहे. भारतामधील रशिअन वकिलातीनें आपले कांहीं तज्ज्ञ नकाशाचा अभ्यास करण्यासाठीं पाठविले आहेत. प्राचीन काळच्या बुद्धभिक्षूंचें व मध्य आशिआंतील रशिअन व्यापाऱ्यांचें परस्परांशीं दळणवळण होतें, असें म्हणतात. नकाशाच्या अभ्यासानें भारताच्या भूगोलावरहि कांहीं प्रकाश पडेल.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.